# आदेश निशाणी ३७

१. कैफियतमध्ये दुरूस्ती करण्यासाठी परवानगी मिळणेकरिता प्रस्तुत अर्ज अर्जदार/प्रतिवादी याने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६, नियम १७ अन्वये सादर केलेला आहे. प्रस्तुत अर्जास गैरअर्जदार/वादी यांनी निशाणी ४० वर म्हणणे देवून अर्ज नामंजूर होण्याची विनंती केली. अर्जदारास यापुढे प्रतिवादी तर गैरअर्जदार यांना यापुढे वादी म्हणून संबोधण्यात येईल.

**प्रतिवादी यांची हकीकत पुढीलप्रमाणे—**

२. प्रतिवादीने सदर प्रकरणात लेखी जबाब सादर केला असून, त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, प्रतिवादी दावा मिळकतीचा मालक असून दावा मिळकत त्याच्या प्रत्यक्ष ताब्यातही आहे आणि वादीचा दावामिळकतीशी काहीही संबंध नाही. सदर जबाबात विशेषत: परिच्छेद क्र. १६ पासून पुढे सविस्तर नमूद केले आहे. प्रतिवादीने दिनांक ३१.०३.२००६ रोजीच्या दस्तावेजाचा उल्लेख केला आहे, जो त्या घटनेच्या नोंदीसंदर्भात आहे. तथापि, प्रतिवादी आता पर्यायी मुद्दा मांडू इच्छितो, त्यामुळे खालीलप्रमाणे परिच्छेद १६—अ समाविष्ट करण्यासाठी हा दुरुस्ती अर्ज सादर केला जात आहे. सदर दावा हा पुराव्याचा टप्प्यावर असून अद्यापपावेतो सुणावणी सुरू झालेली नाही, त्यामुळे ही दुरुस्ती कायद्यानुसार करता येऊ शकते. सदर दुरुस्ती ही खटल्याच्या योग्य निकालासाठी आवश्यक व संबंधित आहे, म्हणूनच प्रतिवादीस खालीलप्रमाणे परिच्छेद समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात यावी.

परिच्छेद १६—अ *“ without prejudice to above, and without admitting anything …………………… question is liable to be dismissed”.*

३. सबब प्रतिवादीने त्याच्या कैफियतमध्ये १६—अ म्हणून वरील प्रमाणे मजकूर समाविष्ट करून सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली.

**वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे—**

४. वादीने प्रतिवादीचा अर्ज नाकारला. प्रतिवादीने त्याचा लेखी जबाब २४.०४.२०२३ रोजी सादर केला होता व आता जवळपास एक वर्ष लोटल्यानंतर, सदर अर्ज सादर करून कैफियतमध्ये बदल करण्याचा प्रयत्न प्रतिवादी करत आहे, जो कायद्यानुसार अनुमत नाही. लेखी जबाबातील परिच्छेद क्र. १६ नुसार, सदर अर्ज प्रामाणिक (बोना फाइड) नसून, वादीने भारतीय पुरावा

अधिनियमाच्या कलम ६६ अंतर्गत दाखल केलेल्या अर्जावर कारवाई होण्याच्या पार्श्वभूमीवर प्रतिवादीने हा दुरुस्ती अर्ज सादर केलेला आहे. वादीने प्रतिवादीस त्याच्या लेखी जबाबात उल्लेख केलेले तथाकथित दस्तऐवज सादर करण्याचे निर्देश देणारा अर्ज दाखल केल्यानंतर, प्रतिवादीने आजतागायत कोणतेही दस्तऐवज सादर केले नाहीत आणि आता सदर दुरुस्ती अर्ज सादर केला आहे, हे प्रतिवादीची खोटी व काल्पनिक तयार केलेली कथा असल्याचे दर्शवते. प्रतिवादी केवळ प्रकरण लांबविण्याच्या हेतूने व आपले बचाव बदलण्याच्या हेतूने सदर अर्ज सादर करीत आहे, जे कायद्याने अनुमत नाही. प्रतिवादीचा सदर अर्ज हा वाईट हेतूने सादर करण्यात आलेला असून, तो कायदेशीरदृष्टया ग्राह्य धरण्यायोग्य नाही. त्यामुळे सदर अर्ज फेटाळावा, ही विनंती वादींनी केली.

५. अर्ज वाचले व त्यावरील म्हणणे वाचले. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ पी.आर.बंग तर वादीतर्फे तर्फे विधीज्ञ एस.एन.सरकाळे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहिता मधील संबंधीत तरतुदींचा संदर्भ घेतला.

६. प्रतिवादीच्या कथनानुसार, त्याला त्याच्या कैफियत मध्ये परिच्छेद क्र. १६—अ म्हणून ''वरील मजकुरावर कोणतीही पूर्वग्रह किंवा कबुली न देता, व प्रतिवादीने परिच्छेद क्र. १६ मध्ये मांडलेले मुद्दे जर मा. न्यायालयास ग्राह्य वाटत नसतील, तर प्रतिवादी हे सादर करतो की, दावा मिळकत बाबतीत दिनांक ३१.०३.२००६ च्या दस्तावेजात स्पष्ट उल्लेख आहे की, ही मालमत्ता प्रतिवादीच्या वडिलांना तोंडी स्वरूपात दिली गेली होती आणि त्याबाबत ताबाही देण्यात आला होता. तसेच सदर दस्तावेजात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, सध्याचे वादी व अन्य व्यक्तींनी सदर मालमत्तेवरील मालकी हक्क व ताबा स्वेच्छेने सोडला होता आणि प्रतिवादीचे वडील तसेच पूर्वज मालकाच्या स्वरूपात ताब्यात होते. त्यामुळे सदर तोंडी हक्क सोडल्याचा उल्लेख लेखी स्वरूपात आल्यामुळे वादीने सादर केलेला दावा खोटा, बनावट आणि काल्पनिक असून, त्यामुळे हा दावा फेटाळला जावा.'' प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीने निशाणी २६ वर लेखी कैफियत दाखल केलेली आहे. निशाणी ३१ वर वादीचा भारतीय पुरावा कायदा कलम ६६ अन्वये अर्ज असून, त्या अर्जावर प्रतिवादीचे म्हणणे येण्याकरीता प्रकरण प्रलंबीत आहे. प्रस्तुत प्रकरणात अदयापपावेतो मुदद् निश्चित करण्यात आलेले नाही त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात अदयापर्यंत सुणावणी सुरू झालेली नाही. सदर अर्जामध्ये सुचवलेली प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी दिली तर वादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. सबब प्रतिवादीस प्रस्तुत अर्जान्वये दाव्यामध्ये सुचविलेल्या दुरुस्तीस परवानगी देणे योग्य

व न्याय्य होईल. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत असून वादप्रश्न क्रमांक २ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रस्तुत अर्जान्वये सुचविलेली दुरूस्ती प्रतिवादीने विहीत मुदतीत करावी आणि त्याचवेळी दुरुस्त कैफियत प्रत सादर करावी.

**स्वा/—**
**(ख्वाजा चॉ. कलाल)**
दिनांक २५/०४/२०२५ सह दि. न्या. क. स्तर, मंगरूळपीर,
ता. मंगरूळपीर, जि. वाशिम.

# C E R T I F I C A T E

“ I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shri. C.R. Gadge |
| Court Name | : | Shri. Khwaja C. Kalal,<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Mangrulpir |
| Date of Order | : | 25/04/2025 |
| Order signed by presiding officer on | : | 15/05/2025 |
| Order uploaded on | : | 17/05/2025 |